**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०
Estd.1962
NAAC ' A ' Grade

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/१०७ दि. 14 AUG 2018

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक व संस्था अध्यक्ष/सचिव,**
**विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये (पांरपारिक/व्यावसायिक),**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय -** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत आयोजित कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत.

**संदर्भ -** श्री.संजय पवार, शिवसेना जिल्हा प्रमुख, माजी विरोधी पक्षनेता, कोल्हापूर यांचे दि.१३/०८/२०१८ रोजीचे पत्र.

**महोदय/महोदया,**

आपणांस विदित आहेच की, उच्च शिक्षण संचालनालयाकडून राबविणाऱ्यात येणाऱ्या दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजर्षी शाहू शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. ७२ वरील दि. ३१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रु. ६,००,०००/- वरून रू ८,००,०००/- करण्यात आलेली आहे.

तथापि, अद्यापही काही महाविद्यालये सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करत नसल्याच्या तक्रारी विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत. सबब, सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच विद्यार्थी व महाविद्यालय यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी **मंगळवार, दि.२१/०८/२०१८** रोजी दुपारी ठिक ०३.३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मा.कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या उपस्थितीत प्राचार्य व संस्थाचालक **(शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित व स्वायत्त महाविद्यालये)** यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी ही बैठक महत्त्वाची असल्याने आपण या बैठकीस न चुकता उपस्थित रहावे, ही विनंती.

**सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.२०/०८/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत विद्यापीठ कार्यालयास सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपीमध्ये सादर करावी.**

सदरचा अहवाल सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार MS Excel मध्ये तयार करून पाठवावा.

**टिप :** **१. सदर बैठकीकरिता संबंधितांना विद्यापीठाचा प्रवास भत्ता व दैनंदिन भत्ता देय असणार नाही.**
**२. सदर बैठकीकरिता प्राचार्य व संस्थाचालक यांनी स्वत: उपस्थित राहावे, प्रतिनिधी पाठवू नयेत.**

कळावे,

आपला,

डॉ. विलास डी. नांदवडेकर
कुलसचिव

**प्रत :**

१. मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर, कोल्हापूर.
२. मा. कुलगुरू / मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. सुरक्षा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४. जनसंपर्क कार्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

| महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम | अभ्यासक्रम प्रकार (अनुदानित/ विनाअनुदानित) | या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | योजना अनुज्ञेय असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या (अभ्यासक्रमनिहाय) | * या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे मुळ शुल्क | विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेले शुल्क | विद्यार्थ्यांना परत दिलेले/माफ केलेले शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | उदाहरणार्थ १.बी.ए.भाग-१ | | | | | | |
| | २.बी.ए.भाग-२ | | | | | | |
| | ३. | | | | | | |
| | ४. | | | | | | |

* - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना